# मुंबई मेट्रोमध्ये रमणा, राजीव यांची नियुक्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने आर. रमणा यांची संचालक (नियोजन आणि रियल इस्टेट) तर राजीव यांची संचालक (प्रणाली आणि संचलन व देखभाल) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

रमणा यांनी मेट्रो-३ मार्गाची अंमलबजावणी, भूसंपादन, पुनर्वसन, पर्यावरण आणि इंटरमॉडल एकत्रीकरण कामे हाताळली. रमणा यांना शहर नियोजन, वाहतूक व परिवहन, वाहतूक आणि प्रादेशिक नियोजन, वित्त, पायाभूत सुविधांची अंमलबजावणी आणि शहरी महामार्ग अशा विविध प्रकल्पांच्या कामाचा तीन दशकांहून अधिक काळाचा अनुभव आहे. राजीव यांनी १९९५ मध्ये भारतीय रेल्वेमधून कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांना रेल्वे आणि मेट्रो रेल्वे प्रणालीतील रोलिंग स्टॉक, ओव्हरहेड ट्रॅक्शन, वीजपुरवठा तसेच इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल संबंधित जवळपास तीन दशकांच्या कामाचा अनुभव आहे.



आर. रमणा



राजीव